संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तिकीट आणि सत्तेचे पत्ते

**निवडणुकांमध्ये** उमेदवारी मिळवण्याकरीता तिकीट हा शब्द वापरला जातो हा शब्द नेमका केव्हा आणि कसा प्रचारात आला हे पाहाणेदेखील रंजक ठरू शकते. या शब्दाचा सर्वप्रथम वापर १९६७ साली झाल्याचे सांगितले जाते. काँग्रेसमध्ये फूट पडली आणि आपल्याला काँग्रेसकडून आणि त्यातही इंदिरा गांधींच्या काँग्रेसकडून उमेदवारी मिळावी यासाठी झुंबडही उडू लागली. त्याकाळी काँग्रेसचे तिकीट मिळवणे हा सन्मानाचा भाग समजला जात होता. परंतु तिकीट मिळवण्यासाठीचे अंतर्गत राजकारण फार वेगळ्या स्वरुपाचे होते कारण त्याचवेळी तिकीट मिळवणारे आणि तिकीट मिळवून देणारे या दोन वर्गांची जोरदार चलती होती. काँग्रेसचे तिकीट मिळणे किंवा मिळवणे ही सोपी गोष्ट नाही मग ते मिळवण्याकरीता काय काय केले पाहिजे. याचेही प्रयोग सुरु झाले. कारण ज्याप्रमाणे एखाद्या प्रवासाला जाताना त्या त्या वाहनाचे तिकीट मिळवावे लागते परंतु कोणतेही तिकीट फुकट मिळत नाही त्यासाठी पैसेही मोजावे लागतात आणि मग तीच कार्यपध्दती सत्तेच्या प्रवासाला निघालेल्या उमेदवारांसाठी लागू झाली. आता तर तिकीट हा शब्द इतका बदनाम झाला आहे की त्याचे रेटही तितकेच जबरदस्त ठेवले जातात. देणारेही तसे पैसे मोजण्याच्या तयारीत असतात. कारण एकदा तिकीट मिळाल्यानंतर सत्तेच्या पत्त्यांचा डाव सुरु होतो. या डावात कोण किती तरबेज आहे. हे त्याच्या खेळावरून नव्हे तर तो कोणाचे पत्ते कापू शकतो. याच्यावरून ठरत असते. म्हणूनच निवडणुकीतले तिकीट आणि सत्तेचे पत्ते याचा अतिशय घनिष्ट संबंध असतो.किंबहुना ज्यांना असे पत्ते खेळण्याची सवय आहे. तेच तिकिटाचीही व्यवस्था करून देऊ शकतात. सामान्य माणूस जे राजकारण समजतो ते प्रत्यक्षात नसते. आणि मग अगदी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत तिकीटे रद्द होतात. सत्तेचे पत्ते कापले जातात. सध्या हा प्रयोग सर्वच राजकीय पक्षांमध्ये सुरु आहे. सत्तेच्या प्रवासाला निघताना ज्यांच्याकडे पैशांच्या बॅगा भरलेल्या असतात त्यांनाच तिकीटे मिळतात. तर ज्यांनी यापूर्वी बॅगा भरून घेतल्या तर पक्षाला किंवा त्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना त्याचा कोणताच पत्ता लागू दिला नाही. अशांचेही पत्ते ऐनवेळी कट होतात.

### सोमय्यांना बाय बाय

मुंबईत ईशान्य मुंबईतून किरिट सोमय्यांचा पत्ता कट झाला. तर आता जळगावमधूनही घोषित झालेल्या स्मिता वाघ यांचाही पत्ता कट करून नवीनच नाव पुढे येऊ घातले आहे. ही धांदल उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत चालू राहू शकते. गेल्या काही दिवसांपासून भाजपाच्या दृष्टीने ईशान्य मुंबई हा मतदार संघ बराच चर्चेचा ठरला होता. विद्यमान खासदाराला घरी बसवण्याचा हा निर्णय इतक्या झटपट घेऊन चालणारा नव्हता त्यासाठी गेल्या सहा महिन्यापासून व्यवस्थित तयारी सुरु झाली. भारतीय जनता पार्टीतर्फे आणि संघाच्या मदतीने एक खाजगी सर्वेक्षण करून घेतले गेले. शिवाय केंद्रिय नेतृत्वाचा कल लक्षात घेतला गेला आणि प्रदेश भाजपातल्या धुसपुशीचा अंदाज घेऊन काही डाव खेळले गेले. सोमय्यांना शिवसेनेचा विरोध होताच. हे तर मोठे निमित्त मिळालेच. परंतु सोमय्या यांचा एकूण व्यवहार प्रदेश आणि केंद्रिय भाजपा नेत्यांना मानवलेला नव्हता. अगदी थेट अमित शहांशी सोमय्याबाबत असलेली नाराजी तर थेट मुख्यमंत्र्यांनीदेखील सोमय्यांबाबत घेतलेली भूमिका त्यांना अनुकूल नव्हतीच. मुख्यमंत्र्यांच्या खास मर्जीतले शिवसेनेशी अनेक वाद होऊनही संबंध टिकवून असलेले आणि थेट गुजरात कनेक्शन असलेल्या मनोज कोटकांनीदेखील सहा महिन्यापूर्वीच आपले सत्तेचे पत्ते उघड केले होते. पक्षांतर्गत नाराजी गेल्या सहा महिन्यात अधिक वाढली तर ईशान्य मुंबईतील मतदारांचा कौलदेखील सोमय्यांच्या विरोधी गेल्याने कोटक यांचे तिकीट जवळपास नक्की झाले होते. यासाठी जाणीवपूर्वक विलंब केला गेला. कारण सोमय्या यांची मानसिकता तयार करावी, प्रयत्न चालू असल्याचा देखावा करावा असे सगळे वातावरण निर्माण केले गेले. परंतु कोटक यांना सहा महिन्यापूर्वीच तुम्ही तयारीला लागा असे संकेतही दिले गेले होते. असा हा तिकिटाचा आणि सत्तेच्या पत्त्यांचा खेळ ईशान्य मुंबईबाबत जसा रंगला तसा तो इतर उमेदवारांच्याबाबतीतही रंगत असतो.

### सत्तेचा बाजार

अगदी प्रदेशाध्यक्ष दानवेंबाबतही परिस्थिती कशी कठीण आहे. हे दाखवण्याचे काम राज्यातल्याच नेतृत्वांकडून व्यवस्थितपणे केले गेले. इतरांना उमेदवारी देण्याचा निर्णय करणाऱ्या दानवेंना आपल्या मतदार संघात नीट समन्वय ठेवता आला नाही हे दाखवून देण्याचेही राजकारण साधले गेले. स्वाभाविकपणे यावेळी दानवेंच्याही मताधिक्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. परवानगीदाखल दिलेली ही उदाहरणे राजकारणाचे स्वरुप किती बदलले आहे याचे निदर्शक ठरते. जनतेशी केवळ निवडणुकीपुरता संबंध ठेवायचा. सोमय्यांसारखे उमेदवार जेव्हा सामान्य मतदारांशी उध्दटपणे वागतात, सामान्य फेरीवाल्याचे पैसे फाडून फेकण्याचा उद्दामपणा दाखवतात. तेव्हा आपण पैशाच्या जोरावर तिकीट मिळवू शकतो अशीच खुमखुमी त्यांच्यामध्ये असते. परंतु त्यांच्यापेक्षाही कोणीतरी सगळ्याबाबतीत वरचढ असू शकतो. हेही या प्रकारातून दिसून आले. पैसा हीच सध्या निवडणुकीची ओळख झालेली आहे. अरूणाचलच्या मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यामध्ये सापडलेली दीड कोटीची रक्कम चौकीदारांच्या कामाविषयीचा संशय निर्माण करते. असाच एकूण हा सत्तेचा उरूस भरवला जातो. कार्यकर्ता, निष्ठा, तत्व या सगळ्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या आहेत. देशाचा कारभार पाहाण्यासाठी एक व्यवस्था आवश्यक असते. या व्यवस्थेसाठी मतदाराला नाईलाजाने मतदान करावे लागते आणि मग दगडापेक्षा विट मऊ हे तत्व स्वीकारून मतदार आपल्या पसंतीचे बटण दाबतो. परंतु लोकशाहीचा विचार करताना हा सगळा सत्तेचा बाजार किती दुर्दैवी आहे याचेच प्रत्यंतर येत राहाते.